नि.दि.**दा.क्र १२/२०२२**
**प्रदीपकुमार वि. विलास**
**निशाणी क्र.१८ लगत**

**<u>वादी स्वत: साक्षीदार क्र.१ प्रदीपकुमार जानबा बागडे यांचा उलटतपास प्रतिवादीचे वकील श्री.यु.जी.सुर्यवंशी यांच्या मार्फत सुरु.</u>**

४८. हे म्हणणे खरे नाही कि, जानबाच्या मृत्युनंतर प्रतिवादी क्र.१ हा काटोल येथे राहायला आला होता. प्रतिवादी क्र.१ हा काटोल येथे राहायला कधी आला हे माझ्या लक्षात नाही. माझी आई कधी नागपूर येथे राहत होती तर कधी वाई येथे राहत होती. हे म्हणणे खरे नाही कि, मी वाई येथे गेल्यानंतर किंवा माझी आई नागपूर येथे आल्यानंतर तिने मला, वडीलांनी श्रेयस याच्या नावाने मृत्युपत्र करुन दिले आहे ही बाब सांगितली होती. हे म्हणणे खरे नाही कि, वडीलांनी श्रेयसच्या नावे मृत्युपत्र करुन दिल्याचे माहीत झाल्यानंतर देखील आम्ही त्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही. हे म्हणणे खरे नाही कि, मृत्युपत्रातील मिळकतीला सर्वे क्र.१०५/२ देण्यात आला. प्रतिवादी क्र.१ हा दिनांक ०५.०६.२०२० रोजी मयत झाला. हे म्हणणे खरे नाही कि, प्रतिवादी क्र.१ चा मृत्यु झाल्यानंतर आम्ही खोटे कागदपत्र तयार करुन सदरचा खोटा दावा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही कि, मृत्युपत्राच्या आधारे प्रतिवादी क्र.३ हा दावा मिळकतीचा मालक झाला. हे म्हणणे खरे नाही कि, प्रतिवादी क्र.३ हा दावा मिळकतीचा मालक झाल्यानंतर तो त्याच्या आईच्या मदतीने दावा मिळकतीची वहीवाट करत होता. हे म्हणणे खरे नाही कि, प्रतिवादी क्र.१ च्या मृत्युनंतर त्याच्या वारसांना दावा मिळकतीशिवाय कोणतेही साधन नाही. हे म्हणणे खरे नाही कि, दावा मिळकत बटाईने देउन प्रतिवादी क्र.१ चे वारस त्यांची उपजिवीका करतात.

४९. हे म्हणणे खरे नाही कि, मृत्युपत्रामध्ये २००७ ऐवजी २००६ तसेच त्याचा रजिस्ट्रेशन क्रमांक बदलल्याची चुक राजस्व अधिकारी यांच्याकडुन झाल्याने आम्ही त्याचा गैरफायदा घेतला. हे म्हणणे खरे आहे कि, आम्ही उप विभागीय अधिकारी यांच्याकडे अपील केली होती परंतु ती सदर कारणाकरिता केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे कि, सदरची अपील खारीज झालेली होती. त्यानंतर सदर न्यायनिर्णयाच्या विरुध्द आम्ही जिल्हाधिकारी यांच्याकडे अपील केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही कि, आम्ही केलेल्या अपीलामध्ये प्रतिवादी क्र.१ ते ३ हजर झाले होते व त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले होते. दिनांक १२.०९.२०२३ रोजी प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी मृत्युपत्राबाबत राजस्व अधिकारी यांच्याकडुन झालेल्या चुकीबाबत तहसीलदार यांच्याकडे अर्ज केला होता त्याबाबत मला माहीती नाही.

५०. हे म्हणणे खरे नाही कि, दाव्यामध्ये दाखल केलेले संपूर्ण कागदपत्र खोटे व बनावट आहेत. हे म्हणणे खरे नाही कि, माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्र.१३ आणि १४ मधील कथने खोटी आहेत. हे म्हणणे खरे नाही कि, मी माझ्या वकीलांच्या मार्फत माहीतीच्या आधिकारात मृत्युपत्राबाबत व

नि.दि.दा.क्र १२/२०२२
**प्रदीपकुमार वि. विलास**
**निशाणी क्र.१८ लगत**

अन्य सर्व दस्ताऐवजांबाबत शासकीय अधिका-यांना माहीती मागतली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही कि, माझ्या पुराव्याच्या परिच्छेद क्र.२६, २८, २९, ३० व ३२ मधील संपूर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही कि, दावा मिळकत ही माझ्या वडीलांची स्वार्जीत मिळकत होती त्यामुळे त्यांनी कोणाच्याही दबावाला बळी न पडता चांगल्या मनस्थितीत असतांना प्रतिवादी क्र.३ याला मृत्युपत्र करुन दिले. हे म्हणणे खरे नाही कि, सदर मृत्युपत्राच्या आधारे प्रतिवादी क्र.३ हा मालक झाला. हे म्हणणे खरे नाही कि, मी प्रतिवादींना नोटीस पाठविली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही कि, प्रतिवादींना त्रास देण्याच्या उददेशाने मी सदरचा खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही कि, दावा मिळकत प्रतिवादींनी ट्रॅक्टरने नांगरली असुन जमीनीमध्ये मोठया स्वरुपात मातीचे ढेकळं असुन ती पडुन आहे. हे म्हणणे खरे नाही कि, माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील संपूर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही कि, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला
फेरतपास काही नाही

**श्रवणोत्तर स्वीकृत**
**समक्ष**

**दिनांक – ०३.१२.२०२४**

**(व्ही. ए. जाधव)**
**सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**काटोल**

**प्रमाणपत्र**

मी खात्रीपूर्वक असे कथीत करतो की, सदर पी.डी.एफ. फाईल मधील साक्षपुरावा हा मुळ साक्षपुराव्याच्या प्रतीप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – अ.य.कुळकर्णी(श्रेणी–३)

JADHAV VIKRAM ABASAHEB

Digitally signed by JADHAV VIKRAM ABASAHEB
Date: 2024.12.03 17:15:21 +0530